२९७०

जा. क्र. माध्य-२/५वी ते ७वी/मान्यता
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांक:- 2 FEB 1994

प्रति,
मुख्याध्यापक,
न्यु. इंग्लिश, स्कुल,
३१६, ससाणे लेन, हडपसर,
पुणे-२८

विषय:- इ. ५वीते७वी चे वर्ग न्यु. इंग्लिश स्कुल, ससाणेनगर, हडपसर, पुणे या माध्य. विभागास जोडणेबाबत.

संदर्भ :- शिक्षणाधिकारी [माध्य] जि. प. पुणे यांचे प. क्र. शिक्षण/माध्य/ह-४/५वी परवानगी/९३-९४ दि. १८/१०/९३.

वरील संदर्भान्वये विषयान्वये कळविण्यात येते की, सन १९८३-९४ या शैक्षणिक वर्षापासुन परवानगी दिलेल्या नवीन माध्य. शाळांना इ. ५वी ते ७वी चे वर्ग नव्याने सुरू करण्यास परवानगी देण्याबाबत शासन पत्र. क्र. एसएसएन/१०८५/२३४८५/२४४-एन माशि-१ दि. २१/१/८६ व दि. २०/१२/८८ च्या शासन आदेशानुसार शिक्षण उप-संचालकांना प्रदान केलेल्या अधिकाराच्या अधिन राहून खालील अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर ससाणे एज्यु. सोसा. हडपसर, पुणे संचलित प्राथमिक शाळेतील इ. ५वी ते ७वी च्या वर्गांना आपले संस्थेच्या माध्यमिक विद्यालयास जोडण्यास परवानगी देण्यात येत आहे.

अटी:-

१] सदरच्या तुकड्या कायम विना अनुदान तत्वावर रहतील.
२] नवीन तुकडीवाढ मागणी केली जाणार नाही.
३] संस्थेने प्राथ. विभागाकडून माध्य. विभागाकडे वर्ग हस्तांतरित करताना आवश्यक त्या इतर बाबींच्या पूर्तता करावी [उदा. फर्निचर, कर्मचारी वर्ग व इतर मुलभूत सुविधा]
४] माध्य. शाळा संहिता ३.२ नुसार सर्व अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.
५] वेळोवेळी निर्गमित करण्यात येणारे शासनाचे आदेश इ. संस्थेवर/शाळेवर बंधनकारक राहतील.
६] शिक्षणाधिकारी [माध्य] जि.प. पुणे यांनी तपासणी करून वरील अटींची पूर्तता झालेली आहे असा अहवाल सादर केल्यानंतरच परवानगी कायम समजण्यात येईल. त्याप्रमाणे संबंधितांना कळवावे.

क्रमाश

७] सदरची परवानगी जून ९३ पासून देण्यात येत आहे.

८] प्राथ. विभागाकडील सर्व कर्मचारी वर्ग माध्य. विभागाकडे समावेशन केला जाईल.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१

प्रत-मुख्याध्यापक,
न्यु. इंग्लिश स्कुल, ससाणेनगर, हडपसर.

त्वरीत

जा.क्र. माध्य-३/४४/नमाशा/[illegible]
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग
पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांक:- 19 DEC 1990

---

प्रति,

सचिव,

- - - - - - - - - - - - - - -

सहाणे एज्युकेशन सोसायटी, पुणे

- - - - - - - - - - - - - - -

विषय:- १९९०.९१ या शैक्षणिक वर्षांत नवीन माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत.....

संदर्भ:- शासन पत्र क्रं. एसएसएन-१०९०/२०६०/माशि-१ दिनांक:- २७.११.९०

शासनाचे संदर्भीय पत्रान्वये आपल्या संस्थेला नविन माध्यमिक शाळांना परवानगी देण्यावर घातलेल्या सर्वसाधारण बंदीला अपवाद म्हणून खालील दर्शविलेल्या ठिकाणी माध्यमातून ~~विना/अनुदान//कायम~~/कायम विना अनुदान तत्वावर "विशेष बाब " म्हणून जून १९९० पासून नविन माध्यमिक शाळा सुरु करण्यास, अनुदान संहितेच्या नियमानुसार आवश्यक असणा-या सर्व अटींची तसेच खालील नमूद केलेल्या विशेष अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवरच परवानगी देण्यात येत आहे.

विशेष अटी:-

अ] या नविन माध्यमिक शाळांना [ इंग्रजी माध्यमाव्यतिरिक्त ] शासन निर्णय शिक्षण व सेवायोजन विभाग क्रं. एसएसएन-१०८८/१६६९/एन/माशि-१ दि.१०.२.८९ अन्वये विहित केलेल्या नविन सुत्रानुसार अनुदान अनुज्ञेय होईल.

ब] सदर माध्यमिक शाळांनी शासनाच्या वेळोवेळी निघणा-या आदेशाचे [उदा. विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत इ.] काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

क] सदर संस्थांची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

ड] इंग्रजी माध्यमांच्या माध्यमिक शाळांसाठी भविष्यकाळात शासनाकडून कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करण्यांत येणार नाही या आर्थिक दृष्टया ~~xxxx~~/ मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी [ इ.बी.सी. च्या ] फीच्या परताव्याची मागणी करण्यांत येणार नाही. अशा ~~xx~~ आशयाचे संस्थेच्या अध्यक्षांचे सहीचे लेखी हमीपत्र संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालकांनी मागवून घेऊन कायम स्वरूपाचे कागदपत्र म्हणून ते सुरक्षितपणे जतन करुन ठेवावे.

इतर अटी:-

१] संबंधित संस्था, मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० या दोन्ही अधिनियमाखाली नोंदणी आवश्यक आहे.

२] संस्था विरुद्ध गंभीर स्वरूपाच्या तक्रारी नाहीत.

३] सदर संस्थेने चालविलेल्या शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

४] संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

ह्या बाबींपैकी एक जरी बाब आपल्या संस्थेच्या विरोधात असली तरी दिलेली परवानगी आपोआप रद्द झाल्याचे समजले जाईल.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १] | ससाणे एज्युकेशन सोसायटी, पुणे | पुणे | आठवी | इंग्रजी |

आपल्या शाळेला खात्याची प्रथम मान्यतेसाठी शाळा संहिता नियम ४३.१ नुसार शाळा सुरु झाल्यापासून एक महिन्याचे आत विहित प्रपत्रात अर्ज करावा.

तसेच मंडळाची प्रथम मान्यतेकरिता महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या विभागीय मंडळाने संस्थांना मान्यता देण्याची कार्यपद्धती मधील नियम २८ मधील १ ते १५ पर्यंत विहीत केलेल्या नियमाप्रमाणे मुदतीत व प्रपत्रात अर्ज करावा.

स्वाक्ष प्रतीवर मा. शि. उ. सं.
यांची सही असे.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१करिता

प्रतिलिपी:- शिक्षणाधिकारी [माध्य.] जिल्हा परिषद पुणे यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरिता अग्रेषित....

त्यांनी वरील नवीन शाळेस तात्काळ भेट देवून पत्रात नमूद केलेल्या अटी व बाबी संस्था पूर्ण करते किंवा नाही याची तपासणी करुन अहवाल त्वरीत या कार्यालयात पाठवावा. तसेच संस्थे विरुद्ध तक्रारी व गैरव्यवहाराची उदाहरणे आपल्या कार्यालयास प्राप्त झाल्यास त्या विषयी सविस्तर अहवाल या कार्यालयास सादर करावा.

सदर नविन माध्यमिक शाळेस प्रथम मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ करावयाची असल्याने शाळेची वर्ग-२ पेक्षा कमी नसणाऱ्या अधिकाऱ्यामार्फत xxx/ तपासणी करुन आपल्या अभिप्रायासह तपासणी अहवाल त्वरीत या कार्यालयात पाठविण्याची व्यवस्था करावी.

प्रतिलिपी:- मा. अवर सचिव, शिक्षण व सेवायोजन विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२ यांना त्यांचे वरील संदर्भांकित पत्रान्वये माहितीस्तव सादर.....

प्रतिलिपी:- मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना माहितीसाठी सादर.....

माध्यमिक शिक्षण विभाग

प्रति,

मा. सचिव
ससाणे एज्यु. सोसायटी
हडपसर, पुणे.

10 JUL 1991

विषय :- जून ९० पासून इ. ९वी च्या वर्गास परवानगी देणेबाबत.

संदर्भ :- १) शासन पत्र क्र. एसएसएन/१३९१/१०५६२२/माशि-१ दि. १०-४-९१.
२) मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग पुणे-१ यांचे पत्र क्र. माध्य-३/व.../पुवि/९१ दि. १४-६-९१.

उपरोक्त विषय व संदर्भ पत्रानुसार कळविण्यात येते की, मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचे पत्र क्रमांक माध्य-३/१४/नमाशा/मान्यता/पुवि, दि. १८-१२-९० अन्वये इ. ८वी ला हडपसर येथे इंग्रजी माध्यमाच्या वर्गास कायम विना अनुदान तत्वावर विशेष बाब म्हणून जून ९० पासून नवीन माध्यमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. व वरील संदर्भ पत्रानुसार इ. ८वी च्या वर्गा ऐवजी इ. ८वी च्या व इ. ९वी च्या वर्गास जून ९० पासून नेहमीच्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर परवानगी देण्यात आली आहे. त्यानुसार कार्यवाही करुन, कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास कळवावा.

शिक्षणाधिकारी (माध्य.)

प्रत,
मा. शिक्षण उपसंचालक

/९१-९२.

पुणे जिल्हा परिषद, पुणे
माध्यमिक शिक्षण विभाग
दिनांक - ४-१२-९१.

प्रति,
मुख्याध्यापक
न्यू इंग्लिश स्कूल,
हडपसर, पुणे-२८.

विषय:- इ. १०वी वर्गास प्रथम मान्यता.

उपरोक्त विषयानुसार कळविण्यात येते की, मा. शिक्षण उपसंचालक पुणे विभाग, पुणे-१ यांचे पत्र क्र. माध्य-३/ब५/पुवि/९१ दि. १४-६-९१ अन्वये इ. ९वी च्या वर्गास शासन मान्यता दिलेली आहे. दि. १२-८-९१ च्या तपासणी अहवालानुसार माध्य. शाळा संहिता नियम क्रमांक ५.२ नुसार उपरोक्त शाळेस जून ९१ पासून इ. १०वी च्या वर्गास कायम विना अनुदान तत्वावर खालील त्रुटींच्या पूर्तता करण्याच्या शर्तीवर मान्यता देण्यात येत आहे.

१) विद्यार्थी संख्या पुरेशी वाढवावी.
२) शारिरिक शिक्षणासाठी क्रिडांगणाची सोय करण्यात यावी.
२) ग्रंथालयातील पुस्तकांची संख्या वाढवावी,
३) शिक्षकांना सुधारित वेतनश्रेणी देण्यात यावी.
४) शाळेची नवीन इमारत लवकर बांधण्यात यावी.
५) डेडस्टॉक, क्रिडासाहित्य, ग्रंथालय इ. रजिस्टर माध्य. विभागासाठी वेगळे तयार करावीत.

वरील त्रुटींची पूर्तता करून, तसा अहवाल

(पुढे पान ५

या कार्यालयास कळवावा.

शिक्षणाधिकारी (माध्य.)
पुणे जिल्हा परिषद, पुणे

प्रत,

सचिव, ससाणे एज्यूकेशन सोसायटी, हडपसर, पुणे-२८, माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी.

३३९३८/१

कायम विनाअनुदानित

जा.क्र.पुवि/उमाशि १/काविअ/प्रथम मान्यता/२०१३-१४/
शिक्षण उपसंचालक कार्यालय, पुणे विभाग पुणे-१
१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे-१
दिनांक : 19 DEC 2013

प्रति
अध्यक्ष/प्राचार्य,
ससाणे एज्युकेशन सोसायटी संचलित,
न्यु इंग्लिश स्कूल व ज्युनियर कॉलेज, ३१६,ससाणे लेन,
हडपसर, ता.हवेली, जि.पुणे.

**विषय :** इंग्रजी माध्यमाच्या इयत्ता १० वी पर्यंत सुरू असलेल्या माध्यमिक शाळांना इयत्ता ११ वी इंग्रजी माध्यमाचे वर्ग कायम विनाअनुदान तत्वावर वाढ करण्यास प्रथम मान्यता देण्याबावत

**संदर्भ :** १.शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक एचएससी १७१०/(२३९/१०) उमाशि -१ दिनांक ९ जून २०१०

२.शासन पत्र क्रमांक एचएससी १७१२/(१९५/(२)१२)उमाशि -१ दिनांक १/११/२०१२

३.शासन पत्र क्रमांक एचएससी १७१२/(३२६/१२)४/उमाशि -१ दिनांक ९/०८/२०१२

४.या कार्यालयाचे परवानगी पत्र शिउसं/उमाशि१/काविअ/पुवि २३४७८/८१ दि.२६/०९/२०१२

५.शिक्षणाधिकारी (माध्यमिक)जि.प.पुणे, दि १७/१२/२०१३/३३५७

उपरोक्त विषयाच्या संदर्भात आपणांस कळविण्यात येते की आपल्या उच्च माध्यमिक शाळेस शासन पत्र क्रमांक एचएससी १७१०/(२३९/१०)उमाशि-१ दिनांक ९ जून २०१० मधील व त्याशिवाय खालील अटींच्या अधीन राहून शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून **" कायम विनाअनुदान तत्वावर " न्यु इंग्लिश स्कूल, ३१६,ससाणे लेन, हडपसर, ता.हवेली, जि.पुणे.** या माध्यमिक शाळेस जोडून इंग्रजी माध्यमाच्या इयत्ता ११ वी वर्गास खाली नमूद केल्याप्रमाणे प्रथम मान्यता देण्यात येत आहे. सदर संस्थेने माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणा-या सर्व बाबींची तसेच खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर इंग्रजी माध्यमाचे इयत्ता ११वी चे वर्ग खालीलप्रमाणे सुरू करण्यास प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

| इयत्ता | शाखा | तुकडी कमांक | माध्यम | एकूण | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| इ.११वी | कला<br>विज्ञान<br>वाणिज्य | प्रथम<br>प्रथम<br>प्रथम | इंग्रजी<br>इंग्रजी<br>इंग्रजी | एक<br>एक<br>एक | कायम विनाअनुदान तत्वावर सन २०१३-२०१४ पासून |

अटी.

१. सदर संस्थांना मान्य केलेल्या उच्च माध्यमिक वर्गांना कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्याचे प्रस्तावित आहे. भविष्यात कधीही अनुदान किंवा कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत किंवा फी चा परतावा दिला जाणार नाही. याबावतचे संस्थेचे अध्यक्ष / सचिव यांचेकडून लेखी रूपये १०० कोर्ट फी स्टॅम्प लिहून देणे आवश्यक राहील.

२. सदर उच्च माध्यमिक शाळेस शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांचे तसेच माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती)विनियम अधिनियम १९७७ व नियमावली १९८१ मधील तरतुदींचे काटेकोरपणे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

३. शासनाच्या पूर्व परवानगीने निश्चित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा अधिक शुल्क विदयार्थ्यांकडून संस्थेस आकारता येणार नाही.

४. संस्थेच्या अध्यक्षांनी कायम विनाअनुदान तत्वावर उच्च माध्यमिकचे वर्ग चालविण्यास तयार असलेबावत रूपये १००च्या कोर्ट स्टॅम्पवर शपथपत्र देणेबावत बंधनकारक राहील.

५. सदर संस्थेची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

६. कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी मिळालेली उच्च माध्यमिक शाळा असा फलक शाळेने ठळक अक्षरात दर्शनी भागात पालकांना दिसेल अशा त-हेने लावणे संबंधित संस्थेवर बंधनकारक राहील.

७. कायम विनाअनुदानित शाळा अशा प्रकारचे लेटरहेड सदर संस्थेने नियमित वापरणे आवश्यक आहे.

८. संबंधित संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० प्रमाणे नोंदणीकृत असणे आवश्यक आहे.

९ सदर संस्थेमार्फत शाळा सुरू करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावाच्या संदर्भात कोणत्याही न्यायालयात दावा चालू नाही असे हमीपत्र सादर करावे लागेल. संस्थेकडून विहीत मुदतीत चलन व प्रस्ताव दाखल करण्यात आलेला असला पाहिजे.

१० प्रस्तुत संस्थेस इयत्ता ११वीचे वर्ग सुरु करण्यास दिलेल्या परवानगीने परिसरातील सध्या सुरू असलेल्या उच्च माध्यमिक शाळांच्या/कनिष्ठ महाविद्यालयांच्या पटसंख्येवर विपरीत परिणाम होणार नाही. ही बाब संस्थेवर बंधनकारक राहील.

११ परवानगी आदेशाच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत संस्थेने राज्यमंडळाकडे संलग्नता प्रमाणपत्राकरीता (प्रथम प्रोव्हिजनल व नंतर रेग्युलर ॲफिलिएशन) अर्ज करणे आवश्यक राहील.

१२ सदर परवानगी आदेश राज्य मंडळातर्फे दिल्या जाणा-या संलग्नता प्रमाणपत्राकरिता (रेग्युलर ॲफिलिएशन) आवश्यक असणाया सर्व निकषांची पूर्तता करण्याच्या अधीन राहतील.

१३ राज्य मंडळाने संलग्नता प्रमाणपत्राकरिता (रेग्युलर ॲफिलिएशन) निश्चित केलेल्या निकषांची पूर्तता न केल्यास सदर परवानगी आदेश रद्द समजण्यात येतील.

१४ परवानगी दिलेल्या ठिकाणावरून सदर शाळेचे स्थलांतर करण्यास परवानगी दिली जाणार नाही.

१५ संबंधित शाळेने शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे व राज्य मंडळ यांच्यातर्फे निर्गमित केल्या जार्णाया सर्व आदेशांचे पालन करणे बंधनकारक राहील.

१६ परवानगी देण्यात आलेल्या उच्च माध्यमिक वर्गामध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणमंडळाने निर्धारित केलेला अभ्यासक्रम शिकविणे आवश्यक राहील.

१७ जनहितार्थ या.क ४८३/0४ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १४ एप्रिल २००९ रोजी दिलेल्या आदेशानुसार खालील बाबींची पूर्तता करावी.

१. कनिष्ठ महाविद्यालयामध्ये सहा महिन्याच्या आत अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी.

२. कनिष्ठ महाविद्यालयाच्या इमारतीमध्ये ज्वलनशील आणि घातक वस्तू ठेवण्यात येऊ नयेत.

३. कनिष्ठ महाविद्यालयाच्या संबंधित कर्मचारी वृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात यावे.

४. कनिष्ठ महाविद्यालयाच्या संबंधित सर्व दृष्टिकोनातून सुरक्षित असल्याची तसेच (National Building Code of India) अंतर्गत विहित केलेल्या मानकाप्रमाणे शाळेची इमारत बांधली असल्याची खात्री दयावी. तसे प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांची राहील.

५. प्रत्येक कनिष्ठ महाविदयालयाच्या इमारतीचे सुरक्षिततेच्या दृष्टीने नियमित तपासणी करण्यात यावी. संबंधित अधिकारी यांनी National Building Code of India चे काटेकोरपणे पालन करावे.

वरील काम जे अधिकारी कर्मचारी करणार नाहीत त्यांचेवर कडक शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

(सुमन शिंदे)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-१

प्रत -

१. मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माधमिक) शिक्षण संचालनालय म.रा.पुणे

२. सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ विभागीय मंडळ, पुणे

३. शिक्षण अधिकारी(माध्यमिक) जि.प.पुणे.

कायम विनाअनुदानित

जा . क्र . पुवि /उमाशि 1/काविअ/प्रथममान्यता/2014-15/9E2C4/CC
शिक्षण उपसंचालक कार्यालय , पुणे विभाग पुणे-1
17 , डॉ . आंबेडकर रोड , पुणे-1
दिनांक : 16 AUG 2014

प्रति
प्राचार्य,
**ससाणे एज्युकेशन सोसायटीचे**
**आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स ज्युनियर कॉलेज**
**स . नं . 311/5, ससाने नगर, हडपसर, पुणे-28**

**विषय** : इंग्जी माध्यमाच्या इयत्ता 10 वी पर्यंत सुरू असलेल्या माध्यमिक शाळांना इयत्ता 12 वी इंग्जी माध्यमाचे वर्ग कायम विनाअनुदान तत्वावर नैसर्गिक वाढीने मान्यता देण्याबाबत .

**संदर्भ** : 1 . शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि . प . पुणे यांचे पत्र क्र . 3357 दि . 17 . 12 . 2013

उपरोक्त विषयाच्या संदर्भात आपणांस कळविण्यात येते की आपल्या उच्च माध्यमिक शाळेस शासन पत्र क्रमांक एचएससी 1713/(113/(13)(1) उमाशि -1 दिनांक 25 . 03 . 2013 मधील व त्याशिवाय खालील अटींच्या अधीन राहून शैक्षणिक वर्ष 2014-15 पासून '**कायम विनाअनुदान तत्वावर ससाणे एज्युकेशन सोसायटीचे आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स ज्युनियर कॉलेज, स . नं . 311/5, ससाने नगर, हडपसर, पुणे-28** या माध्यमिक शाळेस जोडून इंग्जी माध्यमाच्या इयत्ता 12 वी वर्गास खाली नमूद केल्याप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे . सदर संस्थेने माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणा-या सर्व बाबींची तसेच खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर इंग्जी माध्यमाचे इयत्ता 12वी चे वर्ग खालीलप्रमाणे सुरू करण्यास नैसर्गिक वाढीने मान्यता देण्यात येत आहे .

| इयत्ता | शाखा | तुकडी कमांक | माध्यम | एकूण | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| इ . 12 वी | कला<br>विज्ञान<br>वाणिज्य | प्रथम<br>प्रथम<br>प्रथम | इंग्जी<br>इंग्जी<br>इंग्जी | एक<br>एक<br>एक | कायम विनाअनुदान तत्वावर सन 2014-2015 पासून |

अटी .

1 . सदर संस्थांना मान्य केलेल्या उच्च माध्यमिक वर्गांना कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्याचे प्रस्तावित आहे . भविष्यात कधीही अनुदान किंवा कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत किंवा फी चा परतावा दिला जाणार नाही . याबाबतचे संस्थेचे अध्यक्ष / सचिव यांचेकडून लेखी रूपये 100 कोर्ट फी स्टॅम्प लिहून देणे आवश्यक राहील .

2 . सदर उच्च माध्यमिक शाळेस शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांचे तसेच माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती)विनियम अधिनियम 1977 व नियमावली 1981 मधील तरतुदींचे काटेकोरपणे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहील .

3 . शासनाच्या पूर्व परवानगीने निश्चित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा अधिक शुल्क विदयार्थ्यांकडून संस्थेस आकारता येणार नाही .

4 . संस्थेच्या अध्यक्षांनी कायम विनाअनुदान तत्वावर उच्च माध्यमिकचे वर्ग चालविण्यास तयार असलेबाबत रूपये 100च्या कोर्ट स्टॅम्पवर शपथपत्र देणेबाबत बंधनकारक राहील .

5 . सदर संस्थेची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे .

6 . कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी मिळालेली उच्च माध्यमिक शाळा असा फलक शाळेने ठळक अक्षरात दर्शनी भागात पालकांना दिसेल अशा त-हेने लावणे संबंधित संस्थेवर बंधनकारक राहील .

7 . कायम विनाअनुदानित शाळा अशा प्रकारचे लेटरहेड सदर संस्थेने नियमित वापरणे आवश्यक आहे .

8 . संबंधित संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम 1950 व संस्था नोंदणी अधिनियम 1860 प्रमाणे नोंदणीकृत असणे आवश्यक आहे .

9 सदर संस्थेमार्फत शाळा सुरू करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावाच्या संदर्भात कोणत्याही न्यायालयात दावा चालू नाही असे हमीपत्र सादर करावे लागेल . संस्थेकडून विहीत मुदतीत चलन व प्रस्ताव दाखल करण्यात आलेला असला पाहिजे .

10 प्रस्तुत संस्थेस इयत्ता 11वीचे वर्ग सुरू करण्यास दिलेल्या परवानगीने परिसरातील सध्या सुरू असलेल्या उच्च माध्यमिक शाळांच्या/कनिष्ठ महाविद्यालयांच्या पटसंख्येवर विपरीत परिणाम होणार नाही . ही बाब संस्थेवर बंधनकारक राहील .

11 परवानगी आदेशाच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत संस्थेने राज्यमंडळाकडे संलग्नता प्रमाणपत्राकरीता (प्रथम प्रोव्हिजनल व नंतर रेग्युलर ॲफिलिएशन) अर्ज करणे आवश्यक राहील .

12 सदर परवानगी आदेश राज्य मंडळातर्फे दिल्या जाणा-या संलग्नता प्रमाणपत्राकरिता (रेग्युलर ॲफिलिएशन) आवश्यक असणाया सर्व निकषांची पूर्तता करण्याच्या अधीन राहतील .

13 राज्य मंडळाने संलग्नता प्रमाणपत्राकरिता (रेग्युलर ॲफिलिएशन) निश्चित केलेल्या निकषांची पूर्तता न केल्यास सदर परवानगी आदेश रद्द समजण्यात येतील .

14 परवानगी दिलेल्या ठिकाणावरून सदर शाळेचे स्थलांतर करण्यास परवानगी दिली जाणार नाही .

15 संबंधित शाळेने शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य , पुणे व राज्य मंडळ यांच्यातर्फे निर्गमित केल्या जाणाया सर्व आदेशांचे पालन करणे बंधनकारक राहील .

16 परवानगी देण्यात आलेल्या उच्च माध्यमिक वर्गामध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणमंडळाने निर्धारित केलेला अभ्यासक्रम शिकविणे आवश्यक राहील .

17 जनहितार्थ या . क 483/04 मध्ये सर्वोच्च न्यायालयाने दिनांक 14 एप्रिल 2009 रोजी दिलेल्या आदेशानुसार खालील बाबींची पूर्तता करावी .

1 . कनिष्ठ महाविद्यालयामध्ये सहा महिन्याच्या आत अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी .

2 . कनिष्ठ महाविद्यालयाच्या इमारतीमध्ये ज्वलनशील आणि घातक वस्तू ठेवण्यात येऊ नयेत .

3 . कनिष्ठ महाविद्यालयाच्या संबंधित कर्मचारी वृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात यावे .

4 . कनिष्ठ महाविद्यालयाच्या संबंधित सर्व दृष्टिकोनातून सुरक्षित असल्याची तसेच (National Building Code of India) अंतर्गत विहित केलेल्या मानकाप्रमाणे शाळेची इमारत बांधली असल्याची खात्री दयावी . तसे प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांची राहील .

5 . प्रत्येक कनिष्ठ महाविदयालयाच्या इमारतीचे सुरक्षिततेच्या दृष्टीने नियमित तपासणी करण्यात यावी . संबंधित अधिकारी यांनी National Building Code of India चे काटेकोरपणे पालन करावे .

वरील काम जे अधिकारी कर्मचारी करणार नाहीत त्यांचेवर कडक शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी .

( सुमन शिंदे )
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-1

प्रत -

1 . मा . शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माधमिक) शिक्षण संचालनालय म . रा . पुणे

2 . संचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, विभागीय मंडळ, पुणे

3 . शिक्षणाधिकारी(माध्यमिक) जि . प . पुणे